**रे.के.नं.१४६/२०१३**
**नि.क्र. ६४/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ३** याची जबानी व्ही.सी.व्दारे

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - **जयेंद्र रामदास ठाकूर**

वय - **४२ वर्षे**

व्यवसाय - **मजुरी**

राहणार - **आवरे उरण**

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...**

१. घटनेसंबंधी मला पोलिसांनी कोठेही बोलवले नाही. मी पेट्रोलपंपच्या बाजूला नाष्टा करण्यास गेलो असता कॅन्टीन मालक रमेश शिंदे याची सही घेतली व त्यानंतर माझी सही पोलिसांनी घेतली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही असून त्यातील मजकूर मला माहित नाही. करिता सदर पंचनाम्यास सही पुरता **निशाणी क्रमांक ६५** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. करिता परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०८.२०१३ रोजी पोलिस निरीक्षक श्री पाटील यांनी भेंडखळ गावाकडे जाणा-या रस्त्यावर पेट्रोलपंप जवळ पंचनामा कामी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक डंपर क्रमांक एम.एच.४६ एफ ३८८५ हा वाळूची अवैध वाहतूक करताना मिळून आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या डंपरच्या चालकाकडे पोलिसांनी वाळू वाहतूकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे परवाना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रमाण आम्ही पंचांनी डंपर मध्ये पाहणी केली असता त्यात अंदाजे ३ ब्रास वाळू मिळून आली. हे म्हणणे खरे नाही की, त्या डंपरच्या चालकाकडे त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शमश्युद्दीन अंन्सारी

असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, तो झारखंड येथील रहिवाशी असल्याने त्याला हिंदी भाषेत समजावून सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्याकडे पोलिसांनी विचारणा केली असता त्याने ती वाळू वशेणी खाडीतून डंपर मालक हेमंत परदेशी याचे सांगण्यावरून विक्री करीता आणली होती असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, तो डंपर आयशर कंपनीचा पिवळया रंगाचा मॉडेल क्रमांक टी.इ.आर.आर.ए १६एच डी आर असा होता. हे म्हणणे खरे नाही की, ते घटनास्थळ खोपटा ब्रीजकडून नवघर कडे जाणा-या पेट्रोलपंपाजवळची आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या उजव्या बाजूस ३० फुट अंतरावर डिव्हायडर आहे व त्यांनतर विरूध्द दिशेने जाणारा ४० फुट रूंदीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाला लागून डाव्या बाजूस फुटपाथ आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा संध्याकाळी १८.०० वाजता सुरु करून १८.५० वाजता संपवला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर तो डंपर वाळूसह तसेच चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा पोलिसांनी माझ्या समक्ष तयार करून त्यावर मी समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी पुकारा केला असता गैरहजर. सकाळच्या सत्रात आरोपी हजर होता. आरोपीचे वकील गैरहजर करिता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ अंतर्गत उलटतपास बंद करण्यास सबळ कारण असल्याने आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**सरतपास संपला**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**सही/-**

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

दिनांक – १२/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

न्यायालय क्र. २